# परमेश्वराच्या हेतूंस जन्म देणे



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी. वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Giving Birth to the Purposes of God)

# परमेश्वराच्या हेतूंस जन्म देणे

# अनुक्रमणिका

परिचय

1. “मरिया चमत्कार” पासून धडे 1

2. तुमच्यातील ठेव 8

3. प्रार्थनेद्वारे जन्मास आणणे 13

4. बोललेले वचन 17

5. परिश्रमपूर्वक केलेलेकाम 19

# परिचय

बायबल प्रगट करते की जेव्हा परमेश्वराला पृथ्वीवर आपले हेतू प्रगट करावयाचे होते, वेळ आल्यावर त्याने स्वर्गदूतांचा उपयोग केला. परंतु बहुतेकदा तो मनुष्यांद्वारे आपले हेतू व्यक्त करतो. याचा अर्थ हा आहे की तुमच्या आणि माझ्यासारख्या लोकांच्या द्वारे पृथ्वीवर त्याचे हेतू प्रगट होतात.

परमेश्वरासोबत चालत असताना आपणास त्या योजना व हेतू आढळून येतील ज्या तो आपल्याद्वारे पृथ्वीवर प्रगट करील. यापैकी काही अत्यंत महत्त्वपूर्ण असू शकतात—जसे कुमारिकेद्वारे परमेश्वराच्या पुत्राचा जन्म, आणि इतर काही इतकी महत्त्वाची नसतील —जसे ज्याविषयी कोणीही ऐकले नाही अशा दूरच्या गावात नर्सरी शाळा सुरू करणे. तरीही प्रत्येक परमेश्वराचे कार्य आहे जे पृथ्वीवर प्रकट केले जात आहे.

या पुस्तकात पृथ्वीवर देवाच्या हेतूंना जन्म देण्याबाबत काही मूल्यवान अंतर्दृष्टीचा समावेश आहे. म्हणून, आपल्या जीवनाद्वारे परमेश्वराचे कार्य प्रगट करण्यास सुरुवात करा!

देव तुम्हास आशीर्वादित करो!<br>
आशीष रायचूर

# 1
# "मरिया चमत्कार" पासून धडे

**यशया 7:14**
**यास्तव प्रभु स्वतः तुम्हांस चिन्ह देत आहे; पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नाव इम्मानुएल (आमच्यासन्निध देव) असे ठेवील.**

“मरीया चमत्कारा” विषयी विचार करीत असताना त्याचे कार्य पृथ्वीवर प्रगट करण्याविषयी येथे काही अंतर्दृष्टी दिलेल्या आहेत.

## ठरलेल्या वेळी पृथ्वीवर प्रगट झाले

या जगात देवाच्या पुत्राच्या जन्माविषयी एदेन बागेत भाकित करण्यात आले होते, *“आणि तू व स्त्री, तुझी संतती व तिची संतती यांमध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तू तिची टाच फोडशील”* (उत्पत्ती 3:15). यशयासारख्या संदेष्ट्यांनी आणि इतरांनी त्याच्या आगमनाविषयी भाकित केले. तरीही तारणाऱ्याला जगात पाठविण्याची परमेश्वराला घाई होती असे दिसून येत नाही. भविष्यवाणीच्या जवळजवळ 4000 वर्षानंतर, हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण आणले. परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला. *“परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता”* (गलतीकरांस पत्र 4:4). परमेश्वर नेहमीच पृथ्वीवर नेमलेल्या वेळी आपले काम प्रगट करतो. परमेश्वर आपल्याद्वारे जे काम पृथ्वीवर प्रगट करू इच्छितो ते काम तो ठरविलेल्या वेळी प्रगट करील.

## सर्वसाधारण लोकांद्वारे प्रगट केलेले

जेव्हा परमेश्वराला आपल्या पुत्रास या जगात पाठवायचे होते, तेव्हा त्याने एका तरुण यहूदी मुलीची, मरीया नावाच्या कुमारिकेची निवड केली. हा विचार करणे अद्‍त आहे की अधिक महत्त्वाचे काम जे परमेश्वर करणार होता जगाच्या तारणाऱ्यास पाठविण्याचे—ते त्याने एका तरुण कुमारिकेच्या हाती सोपविले. परमेश्वराने किती मोठी जोखीम पत्करली होती! मरियेच्या पोटी गर्भधारण करणाऱ्या बाळाला जर काही झाले असते तर? मरियेला बाळाचा गर्भपात करण्यासाठी भाग पाडण्यात आले असते तर? तिचा गर्भपात झाला असता तर? अथवा जर तिला दगडमार करून मारण्यात आले असते तर? इतिहासातील त्या काळात असे होणे शक्य होते. जगाच्या तारणाऱ्याचे काय झाले असते? मानवजातीचे काय झाले असते? अपयशाच्या सर्व शक्यता असतांनाही, सर्वात मोठे काम एका तरुण कुमारिकेच्या हाती सोपविण्याची जोखीम परमेश्वराने पत्करली. परमेश्वर हे करू शकत असेल, तर नक्कीच, तो इतर  कार्य कोणालाही सोपवू शकतो, असंख्य लोकांना सुवार्ता सांगण्याचे, रोग्यांना बरे करण्याचे, बंदिवानांस मुक्त करण्याचे, राष्ट्रांस आरोग्य देण्याचे इत्यादी—तुमच्या आणि माझ्यासारख्या लोकांच्या हाती देतो. परमेश्वरास सर्वसाधारण लोकांच्या हाती आपले काम सोपविण्याची भीती वाटत नाही. खरे म्हणजे परमेश्वराने सर्वसाधारण लोकांच्या द्वारे पृथ्वीवर त्याचे काम प्रकट करण्याची निवड केली आहे.

## त्यात भेसळ नसावी—निव्वळ त्याच्या आत्म्याने जन्मलेले असावे

मरीयेच्या उदरी देवपुत्राचे गर्भधारण अलौकिक होते ;एक असे काम जे पूर्णरित्या पवित्र आत्म्याद्वारे होते. जरी गर्भधारण मानवी शरीरात झाले, तरी ते चमकाराद्वारे झाले. गर्भधारणेच्या वेळी मनुष्याचा सहभाग त्यात नव्हता. देवदूताने मरीयेला सांगितले *"पवित्र आत्मा तुझ्यावर*

*येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; म्हणून ज्याचा जन्म होईल त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असे म्हणतील"* (लूक 1:35). आमच्याद्वारे परमेश्वर जे कार्य प्रगट करू इच्छितो ते त्याच्या आत्म्याने जन्मलेले असावे. जरी ते आमच्या स्वाभाविक योग्यतेद्वारे आणि बळाद्वारे प्रगट झाले असले, तरी ते आत्म्याने उत्पन्न झालेले असावे. *"देहापासून जन्मलेले देह आहेत आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहेत"* (योहान 3:6). आम्ही आपला मानव तर्क, कल्पना, कल्पकता याद्वारे कार्य करण्याची कल्पना करून ते देवाचे अस्सल कार्य असावे अशी अपेक्षा करू शकत नाही मग ते कितीही आत्मिक का वाटत असेना. जर काम पवित्र आत्म्याने जन्मलेले नसेल तर ते कितीही धार्मिक का वाटत असेना ते शरीराचे कार्य आहे. परमेश्वर शरीराच्या कामांस अभिषेक करणार नाही (निर्गम 30:32).

## लज्जेचे कारण होऊ शकते

मरीयेसाठी हा किती मोठा सन्मान होता की ती एक मानवी पात्र बनली जिच्याद्वारे जगाचा तारणारा जन्माला आला! तरीही, तिला किती लाजिरवाण्या स्थितीत टाकण्यात आले. येथे ती एक तरुण अविवाहित स्त्री होती जी गर्भवती झाली. होय, ती स्वतः परमेश्वराच्या पुत्रासह गर्भवती होती, परंतु तिच्या कुटुंबियांनी आणि मित्रांनी तिचे स्पष्टीकरण स्वीकारले असते का? पवित्र आत्म्याच्या कार्यामुळे ती गर्भवती झाली आहे असे स्पष्टीकरण दिल्यावर त्यांनी तिच्यावर विश्वास ठेवला असता काय? जेव्हा तिच्याद्वारे परमेश्वराच्या पुत्राचा "जन्म" व्हावा अशी परमेश्वराने इच्छा केली तेव्हा त्याने मरीयेला अशा लाजीरवाण्या परिस्थितीत का टाकले?

यात आमच्यापैकी प्रत्येकासाठी एक धडा आहे. बरेचदा देवाने आम्हाला सोपविलेले काम सुरू ठेवित असतांना ते कार्य लज्जेचे कारण सुद्धा असू शकते. परमेश्वर आमच्याठायी व आमच्याद्वारे काय करीत

आहे हे प्रत्येकास समजणार नाही. त्याचे कार्य करण्यासाठी आम्हाला तुच्छ समजले जा़ऊ शकते, आमचा तिरस्कार केला जाऊ शकतो बरेचदा परमेश्वर आम्हाला यातून जाऊ देतो, यासाठी की “शरीराने" मरावे. यासाठी की आम्ही कमी होत जावे आणि परमेश्वराच्या पुत्राने वाढत जावे. आपण प्रभु येशूच्या साक्षीविषयी आणि आमच्याद्वारे तो जे कार्य करीत आहे त्याविषयी लज्जित न होण्यास शिकतो.

परमेश्वराचे अलौकिक कार्य बरेचदा सामान्य, नैसर्गिक प्रक्रियेतून प्रगट केले जाते. जरी अलौकिकरित्या मरीयेच्या गर्भाशयात मुलाची गर्भधारणा झाली असली तरीही तिला दिवस भरेपर्यंत बाळास गर्भात बाळगावे लागले. परमेश्वराने संपूर्ण प्रक्रिया—गर्भधारणा, गरोदरपण आणि प्रसव—चमत्कार म्हणून का केली नाही? जर पहिल्या दिवशी मुलाची गर्भधारणा झाली असती आणि दुसऱ्या दिवशी प्रसूती झाली असती तर हा एक मोठा चमत्कार झाला नसता का? पूर्ण मुदतीसाठी बाळाला गर्भात वागविण्याच्या सामान्य नैसर्गिक प्रक्रियेतून मरियेला का जावे लागले? येथे महत्वाचा धडा असा आहे की बरेचदा परमेश्वराची अलौकिक कार्ये पृथ्वीवर सामान्य नैसर्गिक प्रक्रियेद्वारे पार पाडली जातात. उदाहरणार्थ, कदाचित परमेश्वराने आपणास मजबूत स्थानिक मंडळी उभारण्यास बोलावले असेल. कदाचित त्याला आपाल्याद्वारे हेच कार्य प्रगट करावयाचे असेल. त्याने निश्चितच आपणास या क्षेत्रात अभिषेक केला असेल आणि कृपादान दिले असेल. तरीही, स्थानिक मंडळी तयार करण्यासाठी आपल्याला कठोर परिश्रम करणे, शिकवणे, उपदेश करणे, काळजी घेणे, योजना आखणे आणि आयोजन करणे या सामान्य नैसर्गिक प्रक्रियांमधून जावे लागेल. केवळ आपल्या सामान्य नैसर्गिक प्रयत्नातून परमेश्वराचे अलौकिक कार्य प्रगट केले जाईल.

आणखी एक उदाहरण दैवी तरतुदीचे असेल. परमेश्वराचे लोक म्हणून आम्ही विश्वास ठेवतो की परमेश्वर आपल्या सर्व गरजा पुरवेल.

आपण परमेश्वराच्या या अलौकिक तरतूदीवर विश्वास ठेवतो. तथापि, आम्ही हे जाणण्यात अपयशी ठरू शकतो की अनेक बाबतीत परमेश्वे-राची अलौकिक तरतूद आपल्या स्वतःच्या हातच्या कार्यांद्वारे आपल्या जीवनात येईल. आम्हाला कदाचित काम करावे लागेल आणि तरीही आम्हाला प्राप्त झालेली तरतूद अलौकिक असेल. उदाहरणार्थ, आपा-ल्याकडे नोकरी आहे हा खरोखर एक चमत्कार असू शकतो! आपल्या कामाद्वारे आपल्याला प्राप्त झालेली तरतूद अधिक अलौकिक आहे!

## कदाचित बंद दारांस तोंड़ द्यावे लागेल

बायबल आम्हास सांगते की *"आणि तिला तिचा प्रथमपुत्र झाला; त्याला तिने बाळंत्याने गुंडाळून गव्हाणीत ठेवले, कारण त्यांना उतारशाळेत जागा नव्हती"* (लूक 2:7). आम्हाला हे माहीत नाही की बेथलेहेमात किती उतारशाळा होत्या. आमच्या मनाच्या डोळ्यांनी, आपण कल्पना करू शकतो की मरिया आणि योसेफ कित्येक उतारशाळांजवळ थांबले असतील आणि तरीही त्यांना जागा मिळाली नाही. अथवा कदाचित ज्या एकमेव उतारशाळेत ते गेले, तेथे जागा नव्हती, आणि म्हणून उतारशाळेच्या मालकाने त्यांना गव्हाणीकडे पाठविले. या विश्वाचा परमेश्वर आपल्या पुत्राच्या जन्मासाठी कमीत कमी एक खोली सुद्धा अलौकिकरित्या राखून ठेवू शकला नव्हता का? आपण कल्पना करू शकता का मरियेच्या मनात काय विचार सुरू असतील? तिने विचार केला असेल, "मला खात्री आहे की परमेश्वर आमच्यासाठी जागा राखून ठेवील. जे मूल माझ्या गर्भात आहे, तो परमेश्वराचा पुत्र आहे. मला खात्री आहे की उतारशाळेत आमच्यासाठी जागा असेल." तरीही हे किती निराशाजनक होते की जितक्या दारावर त्यांनी ठोठावले ते बंद दिसत होते, शेवटी त्यांना ती जागा मिळाली जेथे बाळाचा जन्म व्हावा अशी परमेश्वराची इच्छा होती. तसेच, आमच्या जीवनात सुद्धा, आपण पृथ्वीवर परमेश्वराच्या कार्यास जन्म देत फिरत असतांना, हे शक्य असू शकते की अनेकदा आम्हाला बंद दारांस तोंड द्यावे लागते. याचा अर्थ

हा नाही की जे कार्य आपण करीत आहोत ते खरे नाही. बंद दारांचा अर्थ केवळ इतका आहे की आपण दुसरी दारे ठोठावत राहावे असा होतो की आपण पुढे जात राहावे, जोवर आपणास ती जागा मिळत नाही जेथे आपले कार्य सुरू व्हावे अशी परमेश्वराची इच्छा असते.

असे अनेक लोक आहेत ज्यांच्या आत्म्यामध्ये परमेश्वराचे खरे कार्य गर्भधारण करीत आहे. तथापि, जेथे त्यांस असावयास हवे अशा ठिकाणी ते पोहोचत नाहीत, तोवर ते त्यास जन्म देऊ शकत नाहीत. त्यांना “कुठल्याही जागेशिवाय” एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावे लागत असेल आणि प्रसुतीसाठी तोवर जागा सापडत नसेल जोवर ते त्या जागी जाऊन पोहोचत नाहीत जेथे त्यांनी असावे असे परमेश्वरास वाटते. आमच्या द्वारे परमेश्वराचे हेतू जन्मास येऊ शकम ण्यापूर्वी आम्हास योग्य जागी असण्याची गरज आहे.

## त्यांचे रक्षण आणि पोषण करण्याची गरज आहे

मूल असतांना येशूला अगदी तसेच मोठे व्हावे लागले जशी इतर कोणतीही मुले होतात (लूक 2:40). ज्या दिवशी येशूचा जन्म झाला अगदी त्याच दिवशी तो स्वतः खाऊ लागला नाही किंवा स्वतःचे कपडे घालू लागला नाही! उलट, मरियेला कोणत्याही आईप्रमाणे त्याची काळजी घ्यावी लागली आणि त्याचे संगोपन करावे लागले आणि त्याचे पालनपोषण करावे लागले. खरे म्हणजे, येशू बाळ असताना, योसेफ आणि मरीया यांना त्याचा प्राण वाचविण्यासाठी बेथलेहेम सोडून मिसर देशात पळून जावे लागले, कारण हेरोद त्या बाळाचा वध करण्याचा प्रयत्न करीत होता (मत्तय 2:12-16). मरीया आणि योसेफ यांनी हा विचार करून बाळाला सोडून दिले नाही की, “हा तर परमेश्वराचा पुत्र आहे. हा नक्कीच स्वतः खाऊ शकतो, स्वतःचे रक्षण करू शकतो आणि स्वतःची काळजी घेऊ शकतो.” मरीयेवर केवळ देवाच्या पुत्राला जन्म देण्याची जबाबदारी नव्हती पण पालनपोषण, काळजी

आणि त्याचे रक्षण करण्याचीही होती. अगदी त्याचप्रमाणे आपण त्या कार्याचे कारभारी आहोत जे परमेश्वर आपल्याद्वारे जन्मास घालत आहे. आमच्याद्वारे जन्मास येणाऱ्या प्रत्येक कामाचे पोषण झाले पाहिजे, त्याची काळजी वाहिली गेली पाहिजे आणि त्याचे रक्षण करण्यात आले पाहिजे ज्याप्रमाणे आई तिच्या पोटी जन्मास आलेल्या बाळासाठी जबाबदार असते—त्याला भरवण्यासाठी, त्याचे पोषण करण्यासाठी, त्याची काळजी घेण्यासाठी, त्याचे संगोपन करण्यासाठी, आणि बाळाचे रक्षण करण्यासाठी—त्याचप्रमाणे त्या कार्याची आम्हाला काळजी घ्यायची आहे, त्याचे पोषण करावयाचे आहे आणि त्याचे रक्षण करावयाचे आहे ते परमेश्वर आमच्याद्वारे जन्मास घालत आहे. परमेश्वराने आमच्याद्वारे जे कार्य सुरू केले आहे ते नष्ट करण्यासाठी आपण सैतानास किंवा दुष्ट मनोवृत्तीच्या लोकांस परवानगी देऊ शकत नाही.

पुढील प्रकरणात आपण चार तत्त्वांचा विचार करू या ज्यांचा समावेश परमेश्वराच्या हेतूंना जन्म देण्याच्या प्रक्रियेत करण्यात आला आहे.

# 2
# तुमच्यातील ठेव

आमच्यामध्ये जी ठेव आहे त्याच्याद्वारे परमेश्वर त्याचे हेतू प्रकट करतो.

## आमच्याठायी असलेली ठेव हे निश्चित करते की आमच्याद्वारे काय जन्मास येत आहे

**मत्तय 22:33-37**

**33 झाड चांगले आणि त्याचे फळ चांगले असे म्हणा; अथवा झाड वाईट आणि त्याचे फळ वाईट असे म्हणा; कारण फळावरून झाड कळते.**
**34 अहो सापाच्या पिलांनो, तुम्ही वाईट असता तुम्हांला चांगल्या गोष्टी कशा बोलता येतील? कारण अंतःकरणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार.**
**35 चांगला माणूस आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो आणि वाईट माणूस आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टी काढतो.**
**36 मी तुम्हांला सांगतो की, माणसे जो जो व्यर्थ शब्द बोलतील त्याचा हिशेब त्यांना न्यायाच्या दिवशी द्यावा लागेल.**
**37 कारण तू आपल्या बोलण्यावरून निर्दोषी ठरशील आणि आपल्या बोलण्यावरून दोषी ठरशील."**

*"चांगला माणूस आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो."* आमच्याठायी जे जन्मास येते ते आमच्याठायी असलेल्या संपत्तीवर अथवा ठेवीवर अवलंबून असते. जर आमच्या अंतःकरणात चांगली ठेव आहे, तर आपण चांगल्या गोष्टींस जन्म देऊ. जर आमच्या अंतःकरणात वाईट ठेव असेल तर आपण वाईट गोष्टींना जन्म देऊ. आमच्याठायी असलेली ठेव आमच्याद्वारे जे जन्म घेत आहे त्याचे स्वरूप ठरवील.

**मत्तय 7:15-20**

**15 खोट्या संदेष्ट्यांविषयी जपून राहा. ते मेंढरांच्या वेषाने तुमच्याकडे येतात,**

**पण ते अंतरी क्रूर लांडगे आहेत.**
**16 त्यांच्या फळांवरून तुम्ही त्यांना ओळखाल. काटेरी झाडांवरून द्राक्षे किंवा**
**रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढतात काय?**
**17 त्याप्रमाणे प्रत्येक चांगल्या झाडाला चांगले फळ येते आणि वाईट झाडाला**
**वाईट फळ येते.**
**18 चांगल्या झाडाला वाईट फळे येणे शक्य नाही, आणि वाईट झाडाला चांगली**
**फळे येणे शक्य नाही.**
**19 ज्या झाडाला चांगले फळ येत नाही ते प्रत्येक झाड तोडून अग्नीत टाकण्यात**
**येते.**
**20 ह्यास्तव तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल.**

येथे येशू परूश्यांशी बोलत आहे. परूशी समजत की जर त्यों-च्याजवळ *"चांगले फळ"* असेल तर नक्कीच ते झाडही चांगले होईल. पण येशूने दाखवून दिले की अगदी त्याच्या उलट खरे आहे. जर झाड चांगले असेल तर त्याचे फळही चांगले असेल. झाडाचे स्वरूप ते देत असलेले फळ ठरविते. आमच्यामध्ये जी ठेव आहे ती आम्ही उपजवीत असलेले फळ ठरवील. आमच्या जीवनात आम्ही कोणत्या गोष्टीस जन्म देणार आहोत ते त्याद्वारे ठरविले जाईल. आमच्यामध्ये जे आहे त्याद्वारे हे ठरविले जाईल की आमच्या जीवनाद्वारे काय प्रकट होणार आहे. तसेच, आमच्याठायी असलेल्या ठेवीच्या सहयोगाने आपली कामे आमच्याद्वारे प्रकट करतो. म्हणूनच, आम्ही आधीच आमच्यात काय जमा केले आहे आणि आमच्यात काय जमा करणे चालू आहे ते फार महत्वाचे आहे.

## ठेव कशी केली जाते

### *परमेश्वर आपल्या जीवनात गोष्टी जमा करतो*

**योहान 3:27**
**योहानाने उत्तर दिले, "मनुष्याला स्वर्गातून दिल्यावाचून काहीच मिळू शकत नाही."**

परमेश्वर आमच्या जीवनात गोष्टी जमा करू शकतो. आमच्याजवळ असलेली ठेव किंवा उत्तम संपत्ती स्वतः परमेश्वराने आमच्यामध्ये ठेवली आहे. आमच्याजवळ जे आहे त्याचे त्याचा तो स्रोत आहे. जर परमेश्वराने निवड केली, तर तो आमच्या जीवनांत गोष्टी जमा करू शकतो—कृपादाने, अभिषेक आणि इतर क्षमता ज्या यावेळी आमच्याजवळ नाहीत.

## *इतर लोक आमच्या जीवनात जमा करू शकतात*

**नीतिसूत्रे 27:17**
**तिखे तिख्याला पाणीदार करते, तसा मनुष्य आपल्या मित्राचा चेहरा पाणीदार करतो.**

ज्या लोकांशी आपण निगडीत आहोत ते आपल्यात चांगल्या किंवा वाईट गोष्टी जमा करतात. आपण अनुवादाच्या पुस्तकात वाचतो की परमेश्वराने मोशे व यहोशवा यांच्यात संबंध स्थापित केला (अनुवाद 1:38). परमेश्वराने मोशेला सांगितले की त्याने जाऊन यहोशवाला एक पुढारी म्हणून नियुक्त करावे (गणना 27:18-23). मोशेचा अभिषेक यहोशवावर झाला. यहोशवामध्ये ज्ञानाचा आत्मा होता कारण मोशेने त्याच्यावर हात ठेवला होता (अनुवाद 34:9). एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे काहीतरी जमा केले जाते. इतर लोकांद्वारे आपल्या जीवनात चांगली ठेव येऊ शकते. म्हणून, आम्ही ज्या लोकांसह वेळ घालवतो त्यांची आपण हेतूपूर्वक निवड करू शकतो आणि त्यांना आपल्या जीवनात चांगल्या गोष्टी जमा करण्याची परवानगी देऊ शकतो.

## *आपण आपल्या स्वतःच्या जीवनात गोष्टी जमा करू शकतो*

**नीतिसूत्रे 4:23**
**सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंतःकरणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे.**

आपल्या स्वतःच्या जीवनात आपण काय जमा करतो ते आपण

ठरवू शकतो. आम्ही परमेश्वराच्या वचनाचा अभ्यास करून, विशिष्ट लोकांबरोबर वेळ घालवून आणि विशिष्ट क्षेत्रात प्रशिक्षण घेऊन हेतूपुरस्सर ती ठेव तेथे ठेवली आहे. जेव्हा आपल्यात चांगली संपत्ती असते, तेव्हा आपण स्वतःला असे स्थान देत असतो किंवा स्वतःला अशा ठिकाणी ठेवतो जेथे आपल्याद्वारे चांगल्या गोष्टी जन्मास येऊ शकतात.

जेव्हा आपण आपल्याद्वारे परमेश्वर प्रकट करू इच्छित असलेले कार्य समजू लागतो, त्याच गोष्टी आपण आपल्या जीवनात जमा केल्या पाहिजेत आणि यामुळे परमेश्वराच्या कार्यास जन्म देण्यात मदत होते. आपण हे कित्येक मार्गांद्वारे करू शकतो—

- आपल्या जीवनात आवश्यक असलेल्या ठेवी देण्यास परमेश्वराला विनंती करण्याद्वारे,
- जे लोक आम्हाला या गोष्टी देऊ शकतात त्यांच्यासोबत वेळ घालवून, किंवा
- आवश्यक प्रशिक्षण प्राप्त करून.

ठेव आमच्यात असेल तेव्हाच ती पुढे येईल. आमच्यात आधीपासून जमा न केलेली एखादी वस्तू आपण जन्मास आणू शकत नाही. उदाहरणार्थ, जर आपण मंडळीचे पाळक आहात आणि आपण एका नवीन मंडळीचे रोपण केले असल्यास मंडळीच्या संख्येत वाढ व्हावी, संख्येत वाढ व्हावी, मंडळी मजबूत व्हावी अशी परमेश्वराची इच्छा आहे आणि मंडळीने जसे व्हावे असे परमेश्वरास वाटते तसे तिने व्हावे अशी परमेश्वराची इच्छा आहे असे घडावे म्हणून आपल्याला कोणत्या प्रकारच्या ठेवीची आवश्यकता आहे हे आपणास ठरविण्याची गरज आहे. आपल्याला कदाचित परमेश्वराच्या वचनाचा अधिक ठेवा जरूरी असेल, परमेश्वराच्या अभिषेकाची आणखी मोठी ठेव, मंडळीचे नेतृत्व करण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यात सक्षम होण्यासाठी, चांगली

चर्च संस्था आणि व्यवस्थापन कौशल्ये यासाठी अधिक बुद्धीची गरज आहे. म्हणूनच, आपण वचनाचा अभ्यास केला पाहिजे, अभिषेक वाढवला पाहिजे, चांगल्या चर्च व्यवस्थापनाबद्दल जाणून घेतले पाहिजे आणि या सर्व गोष्टी आपल्यात जमा केल्या पाहिजेत यासाठी की मंडळीच्या बाबतीत जरूरी गोष्टी आपणाद्वारे घडवून आणता येतील.

# 3
# प्रार्थनेद्वारे जन्मास आणणे

आम्ही प्रार्थनेद्वारे आमच्या जीवनांत देवाच्या हेतूंना जन्म देतो. प्रार्थना प्रसवप्रक्रिया आहे ज्याद्वारे आपण पृथ्वीवर परमेश्वराच्या गोष्टी अस्तित्व आणतो.

## प्रार्थनेमध्ये, तुम्हाला परमेश्वराच्या हेतूंची समज प्राप्त होते

**1 करिंथ 2:9,10**

**9 हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे, डोळ्यांनी जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही व माणसाच्या मनात जे आले नाही, ते आपणावर प्रीति करणाऱ्यायांसाठी देवाने सिद्ध केले आहे;'**

**10 कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले; कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टीचाही शोध घेतो.**

**1 करिंथ 14:2**

**कारण अन्य भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे, तर देवाबरोबर बोलतो; कारण ते माणसाला समजत नाही; तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो.**

मानवजातीसाठी परमेश्वराची सामान्य योजना आणि हेतू या व्यतिरिक्त, परमेश्वराने व्यक्ती म्हणून आमच्यापैकी प्रत्येकासाठी काही निश्चित गोष्टी योजलेल्या आणि तयार केलेल्या आहेत. *"आपण सत्कृत्ये करावीत म्हणून ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहो. ती सत्कृत्ये आचरत आपण आपला आयुष्यक्रम चालवावा म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली"* (इफिसकरांस पत्र 2:10). आमच्यापैकी अनेकांस आमच्या जीवनासाठी परमेश्वराचे हेतू स्पष्ट नसू शकतात आणि ते त्यांस "गूढ" वाटत असतील. तथापि, परमेश्वराचा आत्मा परमेश्वराचे मन जाणतो. पवित्र

आत्मा परमेश्वराच्या गंभीर गोष्टी जाणतो आणि त्याला परमेश्वराच्या योजना व हेतूंची पूर्ण जाणीव आहे, कारण तो स्वतः परमेश्वर आहे. पवित्र आत्मा परमेश्वराचे हेतू व योजना आम्हावर प्रगट करील. असे कित्येकदा प्रार्थनेत घडते.

## आत्म्यामध्ये प्रार्थना करीत असतांना, आपण परमेश्वराचे हेतू अस्तित्वात आणण्यासाठी प्रार्थना करीत आहा

अन्य भाषेत प्रार्थना करण्याचा (किंवा आत्म्यामध्ये प्रार्थना करण्याचा) सामर्थी फायदा हा आहे की आपण "गूढ गोष्टी" प्रार्थना करीत असतो. जेव्हा आम्ही आत्म्यामध्ये प्रार्थना करतो, तेव्हा खरे म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या जीवनांसाठी परमेश्वराच्या योजना व हेतूंविषयी प्रार्थना करीत असतो, ज्या त्या वेळी गूढ असू शकतात अथवा आमच्यापासून लपलेल्या गोष्टी असू शकतात.

प्रार्थनेद्वारे, परमेश्वर आम्हावर अशा गोष्टी प्रगट करील ज्या तो आमच्या द्वारे जन्मास आणू इच्छितो. आम्ही प्रार्थना करीत असताना गर्भधारणा घडून येते, आणि आमच्या आत्म्यात परमेश्वराचे हेतू गर्भित होतात. आत्म्यामध्ये जेव्हा आपण प्रार्थना करणे सुरू ठेवतो, तेव्हा आपण आत्मिक जगात परमेश्वराचे हेतूंना आकार देऊ लागतो. अद्याप जन्म किंवा प्रसूती घडून आलेली नसेल. परंतु गर्भधारणेच्या समयापासून ते प्रसूती पर्यंत, गर्भावस्थेचा किंवा वृद्धीचा काळ असतो—आंतरिक वाढ आणि अदृश्य जगातील वाढ. आत्म्यामध्ये प्रार्थना करीत असताना हेच घडून येते. आम्हास कुठलेही दृश्य बदल दिसून येत नाहीत, पण आत्मिक जगात, देवाचे हेतू आकार घेत असतात आणि घडले जात असतात, आणि त्या वेळेच्या जवळ येत असतात जेव्हा ते पृथ्वीवर प्रकट केले जाऊ शकतात. म्हणून, जेव्हा आमच्या मनात विचार येतो किंवा आम्हाला दृष्टांत मिळतो आणि जेव्हा परमेश्वर आमच्यावर त्या गोष्टी प्रगट करतो, ज्यांस आमच्या द्वारे सुरू करण्याची त्याची इच्छा

असते, तेव्हा आम्हाला त्यांच्यावर प्रार्थना करण्यात वेळ घालविण्याची गरज असते. योग्यवेळी, जेव्हा काळाची पूर्णता होईल, तेव्हा त्याचे हेतू पृथ्वीवर जन्मास येतील.

## प्रार्थना आपल्या इच्छेस परमेश्वराच्या इच्छेच्या अनुरूप बनविते

**इब्री 5:7-9**

**7 आपल्याला मरणातून तारण्यास जो समर्थ आहे त्याच्याजवळ त्याने आपल्या देहावस्थेच्या दिवसांत, मोठा आक्रोश करत व अश्रू गाळत प्रार्थना व विनवणी केली, आणि ती त्याच्या सद्भक्तीमुळे ऐकण्यात आली;**
**8 तो पुत्र असूनही त्याने जे दुःख सोसले तेणेकरून तो आज्ञाधारकपणा शिकला;**
**9 आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगांच्या तारणाचा कर्ता झाला.**

**मत्तय 26:38,39,42**

**38 तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "'माझा जीव' मरणप्राय, 'अति खिन्न झाला आहे,' तुम्ही येथे थांबा व माझ्याबरोबर जागे राहा."**
**39 मग तो थोडासा पुढे जाऊन पालथा पडला आणि त्याने अशी प्रार्थना केली: "हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो."**
**42 आणखी त्याने दुसऱ्यादा जाऊन अशी प्रार्थना केली, "हे माझ्या बापा, हा प्याला मी प्यायल्याशिवाय टळून जात नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो."**

आमच्या बुद्धीस हे सत्य समजणे कठीण आहे की परमेश्वराच्या पुत्राला आज्ञाधारकपणा शिकावा लागला. तरीही वरील वचने आम्हाला सांगतात की पुत्राच्या मनात पित्याबद्दल "ईश्वरीय भय" अथवा "ईश्वरीय आदर" होता. गेथशेमाने बागेत येशू स्वबलिदानाद्वारे मृत्यूला तोंड देत असताना, त्याने अत्यंत व्यथित होऊन प्रार्थनेत वेळ घालविला आणि वेदनायुक्त अंतकरणाने त्याने विनंती केली, आणि तो अशा ठिकाणी येऊन पोहोचला जेथे तो पित्याच्या इच्छेला "होय" म्हणू

शकला. प्रार्थनेच्या प्रखर वेळेद्वारे त्याची इच्छा पित्याच्या इच्छेच्या परिपूर्णपणे अनुरूप झाली, इतके की तो मरेपर्यंत आज्ञाधारक झाला. तसेच आमच्या जीवनातही बरेचदा, आम्ही प्रार्थनेच्या अशा वेळेत प्रवेश करू शकतो जेथे आपली इच्छा त्याची इच्छा पूर्ण करण्याबाबत पूर्णपणे समर्पित नसते. परंतु जेव्हा आपण त्याच्या सान्निध्यात प्रार्थनेत वेळ घालवितो, आणि बरेचदा जेव्हा आपण त्यातून बाहेर पडतो तेव्हा आमची इच्छा त्याच्या इच्छेच्या अगदी पूर्णपणे अनुरूप ठरते आपण प्रार्थनेच्या वेळेतून असे म्हणत बाहेर पडतो, "प्रभू तुझी इच्छा पूर्ण व्हावी."

अशाप्रकारे, अदृश्य जगातून दृश्य जगात परमेश्वराचे हेतू जन्मास आणण्यास, त्यांस आकार देण्यास, आणि घडविण्यासच प्रार्थना मदत करीत नाही तर प्रार्थना आमच्या इच्छेस पित्याच्या इच्छेच्या अनुरूप बनविण्यास देखील मदत करते, यासाठी की पृथ्वीवर त्याचे हेतू पार पाडण्यास आम्ही तत्पर व्हावे.

# 4
# बोललेले वचन

आपण बोलत असलेले शब्द बरेचदा अशी साधने ठरतात ज्याद्वारे आपण पृथ्वीवर परमेश्वराची इच्छा व हेतू पूर्ण करतो. आमचे शब्द आमच्या वर्तमानासच नव्हे तर आमच्या भविष्यावरही प्रभाव पाडतात आणि आकार देतात.

## असे शब्द बोला जे आपल्या जीवनास परमेश्वराच्या हेतूने प्रज्वलित करतील

**याकोब 3:6**
**जीभ ही आग आहे; ती अनीतीचे भुवन आहे; आपल्या अवयवांत सर्व शरीर अमंगळ करणारा अवयव जीभ आहे; ती सृष्टीचे चक्र पेटवणारी आणि नरकाने पेटवलेली अशी आहे.**

जीभेचा उल्लेख "आग" असा करण्यात आला आहे, जो हे दर्शवितो की जीभेचा मोठा प्रभाव आहे. हे वचन विशिष्टरित्या "अमंगळ" जीभेचा उल्लेख करते—अमंगळ किंवा वाईट बोलणारी जीभ.

ज्याप्रमाणे वाईट जीभ अनीतिचे "भुवन" आहे, त्याचप्रमाणे चांगली जीभ आशीर्वादाचे "भुवन" आहे (याकोब 3:6). एक वाईट जीभ संपूर्ण शरीराला अशुद्ध करते आणि चांगली जीभ आपल्या संपूर्ण शरीरास आशीर्वादित करते. महत्त्वाचा संदेश असा आहे की आपली जीभ आपल्या संपूर्ण अस्तित्वावर परिणाम करते. आपली जीभ आपल्या अस्तित्वाच्या ओघास प्रभावित करते. आपल्या जिभेने आपले जीवन *"प्रज्वलित"* केले जात आहे. आपण बोलत असलेल्या शब्दांद्वारे त्यावर प्रभाव पडत आहे.

वाईट जिव्हा नरकाद्वारे प्रज्वलित किंवा प्रेरित आहे. परंतु जी जीभ आशीर्वादाचे आणि अभिषेकाचे “भुवन” आहे, ती परमेश्वराद्वारे, त्याच्या वचनाद्वारे आणि आत्म्याद्वारे *“प्रज्वलित”* आहे. ही जीभ संपूर्ण शरीरास आशीर्वादित करील. या एका जिभेद्वारे देवाने आपल्यासाठी ठेवलेल्या आशीर्वादांनी आपल्या जीवनास प्रज्वलित केले जाईल. ही अशी जीभ आहे जी पृथ्वीवर देवाचे हेतू प्रकट करेल.

जीभ अपराधी जग बनू शकते किंवा आशीर्वादाचे जग. आपण बोलत असलेल्या शब्दांद्वारे आपण परमेश्वराच्या हेतूंना जन्म देतो. आम्हास असे शब्द बोलण्याची गरज आहे जे परमेश्वराच्या योजना व हेतूंसह आमच्या अस्तित्वाच्या मार्गास *“प्रज्वलित”* करतील. आम्हास परमेश्वराचे शब्द बोलून अस्तित्वात आणण्याची गरज आहे.

## परमेश्वराचे वचन बोलण्याद्वारे बोलून तुमचे जग घडवा

**इब्री 11:3**
**विश्वासाने आपल्याला कळते की, देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली, अशी की, जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही.**

नैसर्गिक ते आध्यात्मिकमधून उद्भवले. अदृश्यातून दृश्य निघाले. स्वाभाविक गोष्टींस जन्म देण्यासाठी ज्या अदृश्य किंवा आत्मिक सामुग्रीचा उपयोग करण्यात आला ती सामुग्री होती परमेश्वराद्वारे बोलण्यात आलेले वचन. अशाप्रकारे, परमेश्वराचे वचन स्वाभाविक जगातील वस्तूंना आकार देते, घडवते, जन्मास आणते, उत्पन्न करते आणि अस्तित्वात आणते. परमेश्वराने आम्हास आमच्या जीवनांत त्याचे वचन बोलण्याचा आणि आम्हाला ते कसे हवे आहे हे ठरविण्याचा अधिकार आणि योग्यता दिली आहे.

तुमच्या जीवनात परमेश्वराची स्वप्ने, योजना आणि हेतू बोला.

# 5
# परिश्रमपूर्वक केलेले काम

**नीतिसूत्रे 10:4**
**सैल हाताने काम करणारा दरिद्री होतो, परंतु उद्योग्याचा हात धन मिळवतो.**

**नीतिसूत्रे 13:4**
**आळशाच्या जिवाला हाव असते तरी त्याला काही मिळत नाही उद्योग्यांचा जीव पुष्ट होतो.**

**1 करिंथ 15:10**
**तरी जो काही मी आहे तो देवाच्या कृपेने आहे आणि माझ्यावर त्याची जी कृपा झाली आहे ती व्यर्थ झाली नाही; परंतु ह्या सर्वांपेक्षा मी अतिशय श्रम केले, ते मी केले असे नाही, तर माझ्याबरोबर असणाऱ्या देवाच्या कृपेने केले.**

जोपर्यंत आपण आपल्या स्वप्नांत रक्त, घाम आणि आसवे मिसळावयास तयार होत नाही तोवर स्वप्ने सत्यस्थितीत येऊ शकत नाहीत! परमेश्वराच्या हेतूंना जन्म देण्यासाठी आम्हाला परिश्रमपूर्वक कार्य करावे लागेल.

*"जे अश्रूपूर्ण नेत्रांनी पेरणी करतात ते हर्षाने कापणी करतील"* (स्तोत्रसंहिता 126:5). जोवर आपण "आसवांची पेरणी" करणार नाही तोवर आपण "आनंदाने कापणी" करू शकणार नाही. आपणाजवळ देवाने दिलेला दृष्टांत किंवा स्वप्न असेल, पण ते पूर्णत्वास आणण्यासाठी संघर्ष करावा लागेल आणि समर्पित होऊन प्रयत्न करावे लागतील. एका विटेवर दुसरी वीट मांडतांना, विरोधाचा वारा अचानक वाहू लागेल आणि काही विटा खाली पडतील. पण त्या उचलून आपण परत बांधणी करणे सुरू केले पाहिजे, आणि पुढे वाढत राहिले पाहिजे. परमेश्वराच्या हेतूंना जन्म देण्यासाठी आम्हाला परिश्रमपूर्वक कार्य करावे लागेल.

परमेश्वराने आम्हाला केवळ स्वप्न पाहणारे बनण्यासाठी पाचारण केलेले नाही तर असे कामकरी बनण्यासाठी बोलाविले आहे जे त्याच्या राज्यासाठी काम करतात. आम्हाला सेवेचे काम करण्यासाठी पाचारण घडले आहे, फक्त सेवाकार्याचे स्वप्न पाहण्यासाठी नाही. सर्व अडचणी आणि आव्हानांतून कार्य करीत राहा आणि स्वप्ने पूर्ण होतील.

माझा विश्वास आहे की असे हेतू किंवा उद्दिष्टे आहेत ज्यांस परमेश्वर आपल्या प्रत्येकाद्वारे जन्मास आणू इच्छितो. असे म्हणत स्वर्गास जाऊ नका, "प्रभु, मी मोठे स्पप्न पाहिले, पण मी काहीही साध्य केले नाही." आम्हास हे जाणून स्वर्गास जाण्याची गरज आहे की आम्ही त्या प्रत्येक गोष्टीस जन्म दिला आहे ज्यांस परमेश्वर आमच्याद्वारे जन्मास आणू इच्छित होता.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखववायास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**


## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

जेव्हा परमेश्वराला पृथ्वीवर आपले हेतू प्रगट करावयाचे असतात, तेव्हा अशी वेळ असू शकते जेव्हा तो देवदूतांचा उपयोग करतो. परंतु बहुतेकदा तो मनुष्यांद्वारे आपले हेतू व्यक्त करतो. याचा अर्थ हा आहे की तुमच्या आणि माझ्यासारख्या लोकांच्या द्वारे पृथ्वीवर त्याचे हेतू प्रगट होतात.

परमेश्वरासोबत चालत असताना आपणास त्या योजना व हेतू आढळून येतील ज्या तो तुमच्याद्वारे पृथ्वीवर प्रकट करू इच्छितो. यापैकी काही अत्यंत महत्त्वपूर्ण असू शकतात—जसे कुमारिकेद्वारे परमेश्वराच्या पुत्राचा जन्म, आणि इतर काही इतकी महत्त्वाची नसतील—जसे ज्याविषयी कोणीही ऐकले नाही अशा दूरच्या गावात नर्सरी शाळा सुरू करणे. तरीही प्रत्येक परमेश्वराचे कार्य आहे जे पृथ्वीवर प्रकट केले जात आहे. या पुस्तकात पृथ्वीवर देवाच्या हेतूंना जन्म देण्याबाबत काही मूल्यवान अंतर्दृष्टीचा समावेश आहे. म्हणून, आपल्या जीवनाद्वारे परमेश्वराचे कार्य प्रकट करण्यास सुरुवात करा!




**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org